**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२२/ 2531
दिनांक :- 23 SEP 2022

प्रति,

**प्राचार्य,**
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापुर/अचलपुर.
डॉ. पंजाबराव देशमुख पॉलिटेक्निक, अमरावती (अनुदानित)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची अतिरीक्त फेरी राबविण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या तीन फे-यानंतर रिक्त राहीलेल्या जागेची आपल्या संस्थेमध्ये संस्थानिहाय दिनांक २६/०९/२०२२ ते २८/०९/२०२२ पर्यंत अतिरीक्त फेरी व अंतिम अतिरीक्त प्रवेश फेरी दिनांक २९/९/२०२२ रोजी राबविली जाणार आहे. सदर फेरी राबविण्यात येत असतांना तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सबंधित अभ्यासक्रमासाठी प्रसिध्द केलेल्या माहीती पुस्तकामध्ये दिलेल्या नियामांचे तंतोतंत पालन करावे व त्यामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपल्या स्तरावरुन नियमानुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियेबाबतची सोबत जोडलेली जाहीरात आपल्या स्तरावरुन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/जाहीरात/२०२२/ 2531

दिनांक :- 23 SEP 2022

## जाहीरात

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाकरीता अतिरीक्त प्रवेश फेरी सुचना.**

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेचे तिन फे-यानंतर संस्थेमध्ये रिक्त राहीलेल्या जागांकरीता प्रवेशाची अतिरीक्त फेरी खालील संस्थांमध्ये संस्थास्तरावर घेण्यात येणार आहे. तरी सदर प्रवेश फेरीकरीता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या केंद्रीभूत प्रवेशाकरीता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या मुळ प्रमाणपत्रासह व विहीत शुल्कासह खालील तक्त्यात नमुद दिनांकास प्रवेशाकरीता त्या त्या संस्थेमध्ये हजर राहावे. याआधी इतरत्र प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी प्रोफार्मा N सादर करणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रवेश फेरीचे स्थळ | अतिरीक्त प्रवेश फेरीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | सबंधित संस्थेत | २६/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, अचलपूर | सबंधित संस्थेत | २६/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| ३ | डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित) | सबंधित संस्थेत | २७/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | सबंधित संस्थेत | २७/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | सबंधित संस्थेत | २७/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| ६ | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम | सबंधित संस्थेत | २८/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |
| ७ | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर | सबंधित संस्थेत | २८/९/२०२२ | सकाळी १०.३० वाजता |

सदर फेरीनंतरही उर्वरीत शिल्लक जागा असल्यास वरील सर्व संस्थामध्ये दिनांक २९/९/२०२२ रोजी अंतिम अतिरिक्त फेरी राबविली जाणार आहे.

तरी सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी. अधिक माहीतीसाठी विद्यार्थ्यांनी सबंधित संस्थेशी संपर्क साधावा. रिक्त जागांचा तपशिल व विहीत केलेले शुल्क सबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर (Website) वर उपलब्ध करुन दिलेले आहे.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.